# महाराष्ट्र शासन
## ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,नगर भवन, मुंबई - ४०० ००१

**शहीद भगतसिंग मार्ग,फोर्ट, मुंबई- ४०० ००१ दुरध्वनी क्र. :- (०२२) २२६६४६३८/२२६७१३३३**

**संकेतस्थळ** - www.dol.Maharashtra.gov.in **ई-मेल** :- director.dol@Maharashtra.gov.in


**जा. क्र.**:४/ग्रंथ खरेदी व ई-बुक्स सूटदर/२०२६-२७/१०४२ दिनांक :-२७/०५/२०२६

**वाचा:-** १. शासन निर्णय वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम,भाग-२, दि.१७/०४/२०१५.

२. ग्रंथ व ई-बुक्स खरेदीसाठी सूटदर निश्चित करण्याबाबतच्या दि. २६/०५/२०२६ च्या बैठकीचे इतिवृत्त.

**आदेश:-**

ग्रंथालय संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय ग्रंथालयाकडून होणाऱ्या ग्रंथखरेदी व ई-बुक्सच्या सुटदरात एकरुपता रहावी म्हणून संचालनालयाकडून सुटदरपत्रके मागविणारी निविदावजा जाहिरात प्रत्येक महसूल विभागातील एका नामांकित वृत्तपत्रांतून प्रसिध्दीसाठी माहिती व जनसंपर्क विभागास देण्यात आली होती. तसेच सदर निविदावजा जाहिरात ग्रंथालय संचालनालयाच्या आणि महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरही प्रदर्शित करण्यात आली होती. विहित मुदतीत प्राप्त झालेले दरपत्रकांच्या आधारे सुटदर निश्चित करण्यात आले. त्यानुसार ग्रंथालय संचालनायामार्फत सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन वित्तिय वर्षांकरीता सर्व शासकीय ग्रंथालयांसाठी पुढीलप्रमाणे निश्चित केलेल्या सुटदराप्रमाणे ग्रंथ खरेदीकरणे बंधनकारक राहील. निश्चित केलेल्या सूटदरापेक्षा कमी सुटदरात ग्रंथ खरेदी करण्यात येऊ नये.

राज्यातील ४४ शासकीय ग्रंथालये सर्व प्रकारची मुद्रीत वाचन साहित्य सन २०२६-२७ व २०२७-२८ या वर्षाकरीता खालील तक्तातील सुटदरानुसार कोणत्याही पुरवठादार, प्रकाशक, वितरक, विक्रेता, लेखक इत्यादीकडून ग्रंथ खरेदी करु शकतील. सुटदरानुसार केलेल्या ग्रंथखरेदीचा अहवाल ग्रंथालय संचालनालयास सादर करावा.

**ग्रंथ खरेदी सूटदर (२०२६-२०२७ व २०२७-२०२८)**

| अ.क्र. | विषय | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|---|
| १ | ललित | २५% | २५% | २५% |
| २ | सामाजिक शास्त्रे | २५% | २०% | २५% |
| ३ | बालवाड:मय | २५% | २५% | २५% |
| ४ | स्पर्धा परीक्षा विषयक ग्रंथ | २५% | २५% | २५% |
| ५ | सर्वप्रकारचं संदर्भ ग्रंथ | २५% | २५% | २५% |
| ६ | शासकीय प्रकाशने | --- | --- | --- |
| ७ | नवसाक्षरांसाठीचे साहित्य/वाड:मयेत्तर | २५% | २५% | २५% |

शासकीय ग्रंथालयांनी प्रचलित खरेदी पध्दती व नियमानुसार होणाऱ्या ग्रंथ खरेदीसाठी सदर सूटदर हे किमान (minimum) असतील. तसेच, सदर ग्रंथखरेदी सूटदर अधिनस्त शासकीय ग्रंथालयांना स्वत:साठी व अन्य शासकीय योजनांतर्गत मान्यता प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांसाठी लागू असतील.तसेच ई-बुक्स खरेदीसाठी संचालनालयास सविस्तर प्रस्ताव सादर करून पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

एखाद्या विशिष्ट मुद्रित ग्रंथाच्या बाबतीत या दराने सुट मिळणे शक्य नसेल वा त्यापेक्षा कमी सुटदराने उपलब्ध होत असेल असे प्रकरण संचालकांकडे सादर केल्यास त्यांच्या निर्णयानुसार खरेदीची कार्यवाही करण्यात यावी. तसेच वेळोवेळी शासनाने व संचालनालयाने दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

**(अशोक मा. गाडेकर)**
**प्र. ग्रंथालय संचालक**

**प्रति,**

१) ग्रंथपाल गट-अ, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई

२) ग्रंथपाल गट -अ, शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे, नागपूर

३) ग्रंथपाल गट -ब, शासकीय विभागीय ग्रंथालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, रत्नागिरी

४) ग्रंथपाल गट -ब, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती ग्रंथालय, दापोली, रत्नागिरी

५) सहाय्यक ग्रंथालय संचालक (अमरावती/छत्रपती संभाजीनगर/नागपूर/नाशिक/पुणे/ मुंबई विभाग )

६) सर्व जिल्हा ग्रंथालय अधिकारी

**प्रत माहितीसाठी सादर :-**

मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग (ग्रंथालय कक्ष), मंत्रालय, मुंबई-३२